# प्रा. अश्विनी खवळे

## ★ इतिहास विभाग ★

### बी.ए. भाग १

### विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर(स्वायत्त)

# वस्तुसंग्रहालय


छत्रपति शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय
Chhatrapati Shivaji Maharaj Vastu Sangrahalaya
(formerly, The Prince of Wales Museum of Western India)

# वस्तूसंग्रहालय

- सुंदर, दुर्मीळ, मूल्यवान व अजब अशा वस्तूंबद्दल मानवाला सदैव कुतूहल वाटत आलेले आहे.
- जगातील वस्तुसंग्रहालयाची सुरुवात ही अशी साध्या सरळ मानवी भावभावनेतूनच झालेली दिसून येते.संग्रहालये हे संस्कृती, इतिहास व चालीरीतींची माहिती घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त साधने आहेत. मौल्यवान वस्तू, कागदपत्रे, नाणी, शस्त्रास्त्रे, भांडी, अलंकार व पुरातत्त्वीय वस्तू यांचा एकत्र केलेला संग्रह इतिहासलेखनासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.
- वस्तुसंग्रहालयाला इंग्रजीत 'म्युझियम' (Museum) असे म्हणतात. हा शब्द ग्रीक भाषेतून आलेला आहे. प्राचीन ग्रीकांमध्ये विद्या व कलेच्या देवतांना 'म्युझेस' (muses) असे म्हटले जात असे. अशा म्युझेसची मंदिरे 'मोझेन' (mouseion) 18 म्हणून ओळखली जातात.
- वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तूंची मांडणी करताना वेगवेगळ्या दृष्टिकोणामधून वस्तू कशा चांगल्या प्रकारे दिसतील याकडे लक्ष दिलेले असते. संग्रहालयामध्ये मांडावयाच्या वस्तू समाजाच्या ज्ञानामध्ये भर टाकण्याचे काम करतात.वस्तुसंग्रहालयामधील वस्तूंचे प्रकटीकरण, प्रदर्शन हे मानवाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. या वस्तू मांडण्याच्या प्रक्रियेशी पुरातत्त्वशास्त्र विविध कला, मानववंशशास्त्र व नवनवीन भौतिकशास्त्रे यांचा जवळचा संबंध असतो.

# संग्रहालय म्हणजे काय ?

- **(अ) अर्थ व व्याख्या (Definition of museum ):**
- वस्तुसंग्रहालयात सांस्कृतिक मूल्ये, कलात्मक वस्तू, ऐतिहासिक, शास्त्रीय व तांत्रिक वस्तू यांचे प्रदर्शन केले जाते.
- **श. म. केतकर** यांच्या मतानुसार, “वस्तुसंग्रहालय म्हणजे मानवी जीवनाच्या भूतकाळातील व्यवहारासंबंधीच्या वस्तूंचे शास्त्रीय संग्रहण, वर्गीकरण व संरक्षण करणारी संस्था होय. जी मनोरंजन व ज्ञान या साधनांनी मानवी प्रगतीच्या कक्षा रुंदावण्यास मदत करते.
- **"यूनोस्कोची व्याख्या** : " वस्तुसंग्रहालय म्हणजे कलात्मक, ऐतिहासिक, शास्त्रीय व तंत्रज्ञानविषयक वस्तूंचा संचय करून आनंद देणारी संस्था होय.“
- **जॉन एम. ए. थॉमसन** : वस्तुसंग्रहालय सामाजिक बांधीलकी अधोरेखित करून 'आम जनतेला सदैव खुली असलेली व जनतेच्या सेवेसाठी आणि विकासासाठी जी केवळ नफा मिळविण्यासाठी उभारलेली नाही अशी कायमस्वरूपी संस्था म्हणजेवस्तुसंग्रहालय' अशी व्याख्या केलेली आहे.
- **मारखम** : मारखम यांच्या मतानुसार, 'वस्तुसंग्रहालय ही समाजाला सेवा देणारी संस्था असून, या सेवांमध्ये वस्तूंची जमवाजमव, त्यांचा अन्वयार्थ लावणे आणि शैक्षणिक सेवा पुरवणे अशांचा समावेश होतो.' म्हणजेच वस्तुसंग्रहालयामध्ये वस्तूंना बोलक्या करणे किंवा अन्वयार्थ लावणे ही एक जबाबदारी निर्माण झाली.
- **बाळासाहेब खेर** : 'पूर्वी वस्तुसंग्रहालय म्हणजे प्राचीन अवशेष राखून ठेवणारी व ज्यामध्ये विद्वानांना शास्त्रज्ञानाचा रस आहे व त्या वास्तूची मांडणी शास्त्रीय पद्धतीने झाली आहे, अशी वास्तू होती; परंतु आधुनिक वस्तुसंग्रहालय म्हणजे शिक्षण देणारी अशी एक संस्थाच आहे. वस्तुसंग्रहालय म्हणजे विद्यापीठच होय. ज्याच्यामार्फत विद्यादानाचे कार्य केले जाते.'

# इतिहास वस्तूसंग्रहालयाची ध्येये व कार्ये: (Aims & Fuctions of History Museum:

- संग्रहालयातील वारसांचे संरक्षण.
- संग्रहालयातील वस्तूंचे प्रदर्शन
- वस्तूंचा अन्वयार्थ लावणे.
- राष्ट्राचा सांस्कृतिक वारसा
- विविध वारसा सांगणाऱ्या वस्तूंचे संकलन
- दुर्मिळ नाण्यांचा संग्रह व प्रदर्शन

# संग्रहालयातील वस्तूंच्या प्रदर्शनाचे प्रकार:

- कायमस्वरूपी Gallary प्रदर्शन
- तात्पुरते प्रदर्शन
- विशेष प्रदर्शन
- शैक्षणिक प्रदर्शन

# वस्तूसंग्रहालयाचे इतिहासाच्या दृष्टीने महत्व:

१. उत्खननात सापडलेल्या वस्तूंचे संकलन, जतन होते व त्यांच्या नोंदी ठेवल्या जातात.

२. अशा वस्तूंचा अन्वयार्थ लावला जाऊन, ऐतिहासिक सत्याचा शोध घेतला जातो.

३. देशाच्या प्रगतीची माहिती प्रदर्शनातून मांडता येते.

४. संग्रहालये काही साहित्याचे प्रकाशन व विक्री करतात. यातून ऐतिहासिकघटना व व्यक्तीचे चरित्र सामान्यांपर्यंत पोहोचते.

५. ऐतिहासिक प्रदर्शनातून तत्कालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वआर्थिक परिस्थितीची कल्पना येते.

६ इतिहासाबद्दलचा दृष्टिकोण बदलतो.७. कला व अभिरुची यात वाढ होते.थोडक्यात, ताम्रपट, भांडी, नाणी व हत्यारे हे इतिहासाचे डोळे आहेत. जे ग्रहालयातच जास्त सुरक्षित असतात.

# वस्तूसंग्रहालयाचे प्रकार :

१. ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय

कला वस्तुसंग्रहालय

शास्त्रीय वस्तुसंग्रहालय

मानवशास्त्र वस्तुसंग्रहालय

ग्रामीण वस्तुसंग्रहालय

बाल वस्तुसंग्रहालय

बहुविध उपयोगी वस्तुसंग्रहालय

# वस्तुसंग्रहालय खालील संस्थांच्या नियंत्रणाखाली :

राष्ट्रीय/ सरकारी

प्रांतीय /राज्ये

स्वायत्त संस्था

स्थानिक स्वराज्य संस्था

विद्यापीठे

खाजगी /वैयक्तिक

# ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय:



# कला वस्तुसंग्रहालय :




This Ph

# शास्त्रीय वस्तुसंग्रहालय:



# मानववंशशास्त्र वस्तुसंग्रहालय



# ग्रामीण वस्तुसंग्रहालय



Museum of Rural life of Punjab

# बाल वस्तुसंग्रहालय



# बहुविध उपयोगी वस्तुसंग्रहालये




